# माझा निर्णय विचारपूर्वक, तरीही तुमच्या भावनांचा आदर

## आमदार सुधीर गाडगीळ कार्यकर्त्यांसमोर भावनिक

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली** : दादा...तुम्ही निवडणूक न लढण्याचा निर्णय मागे घ्या, सांगली शहराला तुमची गरज आहे... अशा शब्दात बुधवारी मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी आमदार सुधीर गाडगीळ यांना साकडे घातले. यावर भावनिक होत 'हा निर्णय मी विचारपूर्वक घेतला आहे, तरीही तुमच्या भावनांचा आदर करून आणि वरिष्ठांशी चर्चा करून फेरविचार करतो अशा शब्दात आमदार गाडगीळ यांनी कार्यकर्त्यांना दिलासा दिला. मात्र या राजकीय नाट्यापासून भाजपामधीलच जवळचे नेते,पदाधिकारी,माजी नगरसेवक दूरच होते.

दरम्यान आमदार सुधीर गाडगीळ यांचा निवडणूक न लढण्याचा निर्णय हा मास्टर स्ट्रोक ठरतो की, माघारीचा निर्णय पक्का ठरतो याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागून आहे. यावेळी कार्यकर्त्यांनीही डोळ्यात अश्रू आणत दादा तुम्हीच निवडणूक लढवायची आहे, तुमची शहराला गरज आहे... अशी भावनिक साद घातली. सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ यांनी एका प्रसिद्ध पत्रकाद्वारे आगामी विधानसभा निवडणूक न लढण्याचा धक्कादायक निर्णय जाहीर केला होता. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये खळबळ उडाली.

काल सकाळी भाजपचे सुमारे दोनशेहून अधिक कार्यकर्ते राजवाड्यातील आमदार गाडगीळ यांच्या निवासस्थानासमोर गोळा झाले आणि त्यांनी आमदार सुधीर गाडगीळ यांना आपल्या निर्णयाचा विचार करण्यासाठी साकडे घातले. यावेळी अनेक कार्यकर्ते भावनिक झाले होते. ज्येष्ठ नेते मुन्ना कुरणे, अश्रफ वांकर, दीपक माने, धीरज सूर्यवंशी, मोहम्मद अली बागवान, अभिजीत मिरासदार, सुभाष गडदे, अविनाश मोहिते, अतुल माने, गीतांजली ढोपे –पाटील,सुजित काटे,अपर्णा गोसावी यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करून आमदार सुधीर गाडगीळ यांना निर्णय मागे घेण्यासाठी विनंती केली.

दादा, तुमच्या निर्णयामुळे कार्यकर्त्यांवर आभाळ फाटले आहे. तुम्हाला असा निर्णय घेण्याचा अधिकार नाही, कार्यकर्त्यांशी बोलून तुम्ही निर्णय घेतला पाहिजे, तुम्ही निर्णय मागे घ्यावा अशी तुम्हाला हात जोडून विनंती आहे. अशा शब्दात कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत आमदार सुधीरदादांना निर्णय मागे घेण्यासाठी विनंती केली. काहींनी यावेळी राजीनामा देण्याचाही इशारा दिला.

यावर बोलताना आमदार सुधीर गाडगीळ म्हणाले, हा निर्णय मी विचारपूर्वक घेतला आहे. माझ्या बंधूंशी याबाबत मी चर्चा केली होती. भाजपा पक्षाने मला सर्व काही दिले आहे.मी कधी आमदार म्हणून विधान भवनात जाईन असे वाटले नव्हते. पण दोन वेळा ती संधी मला मिळाली. या निर्णयाबाबत मी वरिष्ठांनाही कळवले आहे. तुमच्या भावनांचा आदर करून, आणखी चार दिवसांनी विनोद तावडे सांगलीत येणार आहेत, त्यांच्याशी चर्चा करून मी निर्णयाचा फेरविचार करतो असे आमदार सुधीर गाडगीळ यांनी स्पष्ट केले.



भाजपाचे आमदार सुधीर गाडगीळ यांनी विधानसभा निवडणूक न लढवण्याच्या निर्णयानंतर कार्यकर्त्यांनी निवासस्थानी गर्दी करीत निर्णय मागे घेण्याचा आग्रह केला. (छाया–मिलिंद धामणीकर)

### सर्वच नेत्यांची अनुपस्थिती

आमदार गाडगीळ यांची मनधरणी करण्यासाठी सामान्य कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.महापालिकेत ४० नगरसेवक भाजपाचे असतानाही काल प्रत्यक्षात केवळ चार ते पाच च माजी नगरसेवक उपस्थित होते. दोन्ही निवडणूकीवेळी दादा म्हणून भोवती फिरणारे पदाधिकारी, नगरसेवकांनी यावेळी पाठ फिरवल्याचे दिसून आले. परंतु शहरातील एकही प्रमुख नेता या ठिकाणी हजर नव्हता. दादांच्या निवास्थानापासून मिनिटाच्या अंतरावर असणारे नेतेही गैरहजर होते. कार्यकर्त्यांच्यात याची चर्चा सुरू होती.

यावेळी माजी नगरसेविका गीतांजली ढोपे–पाटील,राजेंद्र कुंभार,हे सुधीरदादा तुमची शहराला गरज आहे,तुमचा निर्णय मागे घ्या...असे म्हणत भावनिक झाले. भाजपाचे अतुल माने, अशरफ वांकर, विश्वजित पाटील, सुजित काटे, अविनाश मोहिते यांनीही दादांना निर्णय मागे घेण्याबाबत साद घातली.

# सरकारचे सर्वोत्तम काम सुरू असल्याचा प्रतिसाद येत्या निवडणुकीत दिसेल : खा. श्रीकांत शिंदे

**केसरी वृत्तसेवा**

**इस्लामपूर** : सामान्य नागरिक, युवक, महिलांच्या चेहऱ्यावरील हास्य कल्याणकारी योजनांचीच पोचपावती आहे. महाविकास आघाडीतील प्रत्येकाला मुख्यमंत्री होण्याची घाई आहे.अनेकांमध्ये रस्सीखेच सुरु आहे. काहीजण तर थेट सभेमध्येच आधी मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करा सांगत सुटले आहेत. याउलट आमच्या महायुतीमध्ये प्रचंड समन्वय आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह कोणा मध्येही मतभेद नाहीत. गेल्या दोन वर्षात सरकारचे सर्वोत्तम काम सुरू असल्याचा प्रतिसाद येत्या निवडणुकीत दिसेल, असे मत खासदार श्रीकांत शिंदे यांनी इस्लामपुरात पत्रकारांशी बोलताना दिली.

शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवादाच्या निमित्ताने खा. शिंदे इस्लामपूर येथे आले होते. माजी खासदार राहुल शेवाळे,खासदार धैर्यशील माने,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंदराव पवार उपस्थित होते.

खासदार शिंदे म्हणाले, सध्याच्या आमच्या सरकारने नाविन्यपूर्ण व जनकल्याणकारी योजना आणल्या आहेत. ग्रामीण भागामध्ये या योजना तळागाळापर्यंत पोहोचल्या असल्याची प्रतिक्रिया आहेत. युवक, महिला,विद्यार्थी, तरुण, जेष्ठ नागरिक यांच्यासाठीच्या आणलेल्या वेगवेगळ्या योजनांमुळे महायुतीला सकारात्मक वातावरण आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार या तिघांमध्ये समन्वय आहे. राज्यात सर्वाधिक उमेदवार निश्चित विजयी होतील.ते म्हणाले, कोल्हापूर जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघाचा काल आढावा घेतला. आज सांगली जिल्ह्यातील विधानसभा क्षेत्रामध्ये आढावा घेत आहोत. इस्लामपूर विधानसभा मतदारसंघातील चांगली परिस्थिती आहे. विविध योजनेसाठी येथील शिवसेनेने वीस हजारहून अधिक लाभार्थी केले आहेत. खासदार धैर्यशील माने यांच्या विजयात येथील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोठा वाटा आहे.

ते म्हणाले, मालवणमधील पुतळा पडला ही दुर्दैवी बाब आहे. जे दोषी असतील त्यांच्यावर सरकार कठोर कारवाई करेल. आहे त्याच ठिकाणी लक्षवेधी पुतळा बसवला जाईल.

ते म्हणाले, ज्या ज्या ठिकाणी १०० टक्के कार्यकर्ते काम करत आहेत. अशा कार्यकर्त्यांना महायुतीकडून निश्चित उमेदवारी मिळेल. कार्यकर्त्यांना शिवसेनेतर्फे ही उमेदवारी दिली जाईल. आम्ही समन्वयांनी महायुतीचे उमेदवार निश्चित विजय करू असा विश्वास आहे.

उत्तर व पश्चिम महाराष्ट्रात शिवसेनेतर्फे पक्ष संघटन कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला आहे. आढावा बैठक घेतल्या जात आहेत. यातून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसत आहे. सामान्य नागरिक, युवक, महिला यांच्या चेहऱ्यावरील हास्य कल्याणकारी योजनांचीच पोचपावती आहे.



इस्लामपूर ; शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या संवाद मेळाव्यात खा. श्रीकांत शिंदे यांचे स्वागत करताना जिल्हा प्रमुख आनंदराव पवार, शेजारी खा. धैर्यशील माने.



राजवर्धन घोरपडे यांच्या वाढदिवसानिमित्त रावसाहेब पाटील, रामचंद्र पाटील यांनी सत्कार केला.

## बसस्थानक परिसरातून मोटारसायकलची चोरी

**केसरी वृत्तसेवा**

सांगली : शहरातील मुख्य बसस्थानक परिसरातील एका हॉटेल समोर लावलेली दुचाकी चोरीला गेली आहे . याबाबत अनिल पुंडलिक काटकर (रा. भुईराज हौसिंग सोसायटी, गणेशनगर, सांगली) यांनी सांगली शहर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे. ही घटना दि. २७ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते ११ या दरम्यान घडली. फिर्यादी अनिल काटकर यांनी त्यांची दुचाकी (क्र. एमएच १० सीव्ही २१३३) हॉटेल विरेन समोर लावली होती. चोरट्याने दुचाकीचे कुलूप तोडून ती लंपास केली.

**ADIARIHANT MUTUAL BENEFIT NIDHI LIMITED**
**REGD OFF: H NO 334, FRONT OF MIDC KUPWAD KUPWAD SANGLI SANGLI MH416425 IN, EMAIL ID: nasalapurebuildcom@gmail.com**

**Public Notice**
**(Pursuant to section 20 read with Section 96 and Section 101 of the Companies Act, 2013)**
NOTICE is hereby given that the 6th Annual General Meeting of Members of ADIARIHANT MUTUAL BENEFIT NIDHI LIMITED will be held on Monday, the 30th day of September, 2024 at 11.00 AM at the registered office of the company situated at H NO 334, FRONT OF MIDC KUPWAD KUPWAD SANGLI SANGLI MH 416425 IN to transact the following business:
**ORDINARY BUSINESS :**
1. To consider and adopt the financial statements for 31/03/2024.
2. To consider retirement by rotation of Director and re-appointment thereof.
3. To appoint Statutory Auditor of the Company.
**SPECIAL BUSINESS :**
**To consider and if thought fit to pass the following resolutions:**
4. To consider and approve the increase in Authorized share capital of the Company.
5. To consider and approve Directors remuneration.
A copy of notice along with the explanatory statement is affixed on the notice Board of the Company. The same can be delivered to the member on request and payment of fees. In case of any queries, members may contact registered office of the Company.
**BY ORDER OF THE BOARD OF DIRECTORS**
**FOR ADIARIHANT MUTUAL BENEFIT NIDHI LIMITED**
**Sd/-**
**DHEERAJ ADINATH NASALAPURE**
**DIRECTOR**
**DIN: 07551383**
PLACE: SANGLI
**NOTES :**
A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote instead of himself and the proxy need not be a member of the company.
Proxies in order to be effective must be lodged with the company at its registered office at least 48 hours before the time appointed for the meeting.

# बँकेतील कर्मचाऱ्यासह संगनमत करून २३ लाखांची फसवणूक

## – ऑरबीट क्रॉप मायक्रोनुट्रीयटस्‌मधील प्रकार

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली** : शहरातील कृषी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या ऑरबीट क्रॉप मायक्रोनुट्रीयटस् या कंपनीस त्यामध्ये काम करणाऱ्या दोघांसह बँकेतील दोघा अधिकाऱ्यांनी संगनमत करुन तब्बल २३ लाख २५ हजार २८४ रुपयांचा गंडा घातला. ही घटना सन २०१८ ते दि. ५ ऑक्टोबर २०२३ या कार्यकाळात घडली.

याबाबत दिपक प्रकाश राजमाने (रा. सिध्दीविनायकपुरम गृहनिर्माण सोसायटी, ई विंग ओ युनिट, दत्तनगर, सांगली) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी उत्तम महावीर अडसूळ (वय ३७), भाग्यश्री उत्तम अडसूळ (वय ३३, दोघे रा. झिल इंटरनॅशनलनजीक, कुपवाड) रविराज मुरग्याप्पा पळसे (वय ४२, रा. दत्तनगर,कर्नाळ रस्ता, जॅकवेल रस्ता, सांगली) आणि विवेक रंजन (वय ४९, रा. श्रीराम संकुल, एसटी कॉलनी रस्ता, विश्रामबाग, सांगली) यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल केला आहे.

घटनेची माहिती अशी, शहरातील विजयनगर परिसरात मागील काही वर्षापासून ऑरबीट कंपनीचे कार्यालय सुरु करण्यात आले आहे. त्यामध्ये मुख्य लेखाकार म्हणून उत्तम अडसूळ आणि सह लेखाकार भाग्यश्री अडसूळ या कार्यरत होत्या. आर्थिक सर्व व्यवहार हे दोघेच सांभाळत होते. दरम्यान त्यांची युनियन बँक डेप्युटी ब्रँचचे रविराज पळसे आणि मार्केट यार्ड येथील शाखेतील शाखाधिकारी विवेक रंजन यांच्याशी ओळख झाली होती. चौघा संशयितांनी आर्थिक गैरव्यवहार करण्याचा प्लॅन आखला. कंपनीच्या देखभालीसाठी आणि कर्मचाऱ्यांच्या पगार करण्यासाठी फिर्यादी दिपक राजमाने यांनी कोरे धनादेश लेखाकारांच्या ताब्यात दिले होते.

धनादेशावर परस्पर रक्कम टाकून ते पैसे काढण्यात येत होते. हा प्रकार सन २०१५ पासून सुरु होता. कंपनीच्या वसुली अधिकाऱ्यांनी वसुल केलेली रक्कम संशयित कंपनीच्या खात्यावर टाकणे बंधनकारक असताना संशयित उत्तम अडसुळ हा ती रक्कम स्वत:च्या खात्यावर वर्ग करीत होता. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर देखील फिर्यादी दिपक राजमाने यांच्याकडून फिर्याद दाखल करण्यास विलंब लागला. पोलिसांनी संशयिताना अद्यापी ताब्यात घेतलेले नाही.

# युवा नेते राजवर्धन घोरपडे यांच्यावर विविध स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव

**केसरी वृत्तसेवा**

**कवठेमहांकाळ** : तासगाव – कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते, सुप्रिम शुगरचे चेअरमन, अजितराव घोरपडे अर्बन क्रेडिट सोसायटीचे संचालक, शेतकरी दूध उत्पादक व प्रक्रिया संघाचे संचालक राजवर्धन घोरपडे यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी दिवसभर त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करणयात आला. दूध संघाच्या कार्यालयात राजवर्धन घोरपडे यांना सामान्य जनता, कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

माजी मंत्री अजितराव घोरपडे, सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती रावसाहेब राजाराम पाटील, संचालक रामचंद्र हरी पाटील, माजी जि. प. सदस्य राजाराम पाटील, तानाजी यमगर, कवठेमहांकाळ विकास सोसायटीचे चेअरमन तुकाराम पाटील, माजी चेअरमन दिलीप झुरे, नगरसेवक विश्वनाथ पाटील, पांडुरंग पाटील, कैलास पाटील, कवठेमहांकाळ विकास सोसायटीचे ज्येष्ठ संचालक तुकाराम आबा पाटील , चंद्रकांत पाटील , बनेवाडी चे माजी सरपंच कुंडलिक जगताप , ईश्वर झुरे, संजय झुरे, सुदर्शन शिंदे, अजित यमगर, विशाल गिड्डे , शिवाजी कारंडे, बाबुराव सुर्यवंशी, पोपटराव पवार यांनी राजवर्दन घोरपडे यांना शुभेच्छा दिल्या .

खा. विशाल पाटील, माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, संग्राम देशमुख, माजी मंत्री दिलीप देशमुख, पृथ्वीराज पाटील, माजी मंत्री अजित देशमुख, सत्यजित पाटणकर, रामराजे निंबाळकर, आमदार शिवेंद्रराजे भोसले यांनी राजवर्दन घोरपडे यांना भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

### निधन वार्ता

**आनंदराव पाटील**



**शिराळा** : नाटोली (ता. शिराळा) येथील आनंदराव बापूसो पाटील (शास्त्री) वय वर्षे (७२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते माजी मंत्री शिवाजीराव नाईक (साहेब) यांचे सहकारी व यशवंत सहकारी ग्लुकोज कारखान्याचे उपाध्यक्ष या पदावर काम करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, पुतणे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. रक्षाविसर्जन शुक्रवार दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी ९.३० वाजता नाटोली (ता. शिराळा) येथे होणार आहे.

**शिवाजी जाधव**



**सांगली** : ज्योतिष शास्त्रातील नावाजलेले व ज्योतिष शास्त्राचा गाढा अभ्यास असणारे शिवाजी लक्ष्मण जाधव (वय ८२) राहणार सांगली यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पाठीमागे दोन मुले व परिवार आहे.

# पॅरालिम्पिकमध्ये आटपाडीच्या सचिन खिलारीला रौप्यपदक

## भारताने ४० वर्षांनंतर गोळाफेकमध्ये जिंकले पदक

**केसरी वृत्तसेवा**

**आटपाडी** : करगणी ता.आटपाडी गावचे सुपुत्र सचिन खिलारीने पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये पुरुषांच्या गोळाफेक एफ ४६ प्रकारात रौप्य पदक पटकावले. त्याच्या या कामगिरीमुळे भारताने ४० वर्षांनंतर पॅरालिम्पिकमध्ये गोळाफेक क्रीडा प्रकारात पदक जिंकले आहे. यापूर्वी १९८४ मध्ये भारताने या क्रीडा प्रकारात पदक जिंकले होते. सचिनच्या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारताच्या पदकांची संख्या २१ झाली आहे. सचिनने तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. आटपाडी सह जिल्हा आणि राज्यस्तरातून सचिन खिलारी यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

सचिनचे सुवर्णपदक अवघ्या ०.०६ मीटरने हुकले मात्र सचिन खिलारीने आज १६.३२ मीटर्सच्या आशियाई विक्रमी थ्रोसह दुसरे स्थान पटकावले.




सचिनचे सुवर्णपदक अवघ्या ०.०६ मीटरने हुकले. कॅनडाच्या ग्रेग स्टीवर्टने १६.३८ मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह सुवर्णपदक तर कांस्यपदक क्रोएशियाच्या लुका बाकोविच याने मिळवले. या स्पर्धेत भारताचा मोहम्मद यासर आठव्या तर रोहित कुमार नवव्या स्थानी राहिला.गोळाफेक अंतिम फेरीत सचिनचा पहिला प्रयत्न १४.७२ मीटर, दुसरा १६.३२ मीटर, तिसरा १६.१५ मीटर, चौथा १६.३१ मीटर, पाचवा प्रयत्न १६.०३ मीटर आणि सहावा (शेवटचा) प्रयत्न १५.९५ मीटर होता. पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मधील भारताचे हे २१ वे पदक ठरले आहे. सचिनने २०२३ वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये पुरुषांच्या शॉटपुट एफ ४६ स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. तसेच २०२४ च्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियन शिपमध्येही सुवर्णपदकावर मोहोर उमटवले होते.

# दुचाकीची धडक, महिला जखमी

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली** : भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने धडक दिल्याने झालेल्या अपघातात महिला गंभीर जखमी झाली. हा अपघात दि. ३ रोजी दुपारी २ च्या सुमारास सांगली ते अंकली रस्त्यावरील णमो टाईल्स मार्बल या दुकानासमोर घडला. याबाबत जखमी माधवी धनंजय हेगाण्णा (वय ५०, रा. सांगली – कोल्हापूर रस्ता,माणगावे पेट्रोल पंपासमोर, जयसिंगपूर) यांनी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. घटनेची माहिती अशी, फिर्यादी माधवी हेगाण्णा या खाजगी नोकरीत कार्यरत आहेत. दि. ३ रोजी दुपारच्या सुमारास त्या दुचाकीवरुन जयसिंगपूरकडे निघाल्या होत्या. त्या अंकली फाट्यानजीक आल्या असता पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. त्यांना दुखापत झाली तसेच दुचाकीचेही नुकसान झाले. दुचाकीचालक घटनास्थळी थांबता तेथून पसार झाला. पोलिसांनी चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# शंभरफुटी परिसरातील बंगला फोडला, ८५ हजाराचे दागिने लंपास

**केसरी वृत्तसेवा**

सांगली : शहरातील शंभर फुटी रस्ता परिसरातील बंद बंगला मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी फोडला. बंगल्यातील साहित्य विस्कटून कपाटातील ८५ हजाराचे दागिने लंपास केले. याबाबत सांगली शहर पोलीस ठाण्यात संजय सिदगोंडा पाटील (रा. शांतीकुंज बंगला, अरिहंत कॉलनी, शंभर फुटी रस्ता, सांगली) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार , फिर्यादी संजय पाटील यांचा वैद्यकीय औषध विक्रीचा व्यवसाय आहे. मंगळवार दि. ३ रोजी काही कामानिमित्त ते बंगल्यास कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास बंगल्याचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. आतील साहित्य विस्कटून कपाटाचे कुलूप उचकटले. आतील ८५ हजारचे सोने – चांदीचे दागिने लंपास करुन चोरट्याने पोबारा केला. ही बाब बुधवार दि. ४ रोजी सकाळच्या सुमारास निदर्शनास आली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**फॉर्म ए**
**जाहीर घोषणा**
(दि इन्सॉलव्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया मंडळाच्या (कार्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम २०१६ च्या नियमन ६ अंतर्गत)

**टफ कास्टींग प्रायव्हेट लिमिटेडच्या क्रेडिटर्सचे लक्ष वेधण्यासाठी**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १ | कार्पोरेट कर्जदाराचे नाव | टफ कास्टींग प्रायव्हेट लिमिटेड |
| २ | कार्पोरेट कर्जदाराच्या प्रधिकरण समावेशाची तारीख | १६/३/१९८८ |
| ३ | कार्पोरेट कर्जदार ज्यांच्या अंतर्गत स्थापित/नोंदणीकृत आहे असे प्राधिकरण | कंपनी निबंधक कार्यालय, पुणे |
| ४ | कार्पोरेट कर्जदाराचा कार्पोरेट आयडेंटिटी नं./लिमिटेड लायबलिटी आयडेंटीफिकेशन नं. | यू २७३१० पीएन १९८८ पीटीसी ०४६५६२ |
| ५ | कार्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रधान कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | ई ६८, एमआयडीसी शिरोली, कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६ १२२ |
| ६ | कार्पोरेट कर्जदाराची दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | ०३/०९/२०२४ |
| ७ | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजे तारीख | ०२/०३/२०२५ |
| ८ | लिक्विडेटर म्हणून कार्यरत असलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | श्री. भरत रमाकांत उपाध्ये<br>नोंदणी क्र. आयबीबीआय/आयपीए–००२/आयपी–एन ००१२०/२०१७–२०१८/१०२८९ |
| ९ | मंडळाकडे नोंदविल्याप्रमाणे लिक्विडेटरचा पत्ता व ई मेल | ५०७, पाचवा मजला, सी–२, स्कायलाईन वेल्थ स्पेस, स्कायलाईन ओअॅसीस कॉम्प्लेक्स, प्रीमीअर रोड, विद्याविहार स्टेशनजवळ, घाटकोपर पश्चिम, मुंबई ४०००८६<br>**नोंदणीकृत ई मेल आयडी** : brupadhyay@hotmail.com |
| १० | लिक्विडेटरचा पत्रव्यवहाराकरिता पत्ता आणि ई मेल | ५०७, पाचवा मजला, सी–२, स्कायलाईन वेल्थ स्पेस, स्कायलाईन ओअॅसीस कॉम्प्लेक्स, प्रीमीअर रोड, विद्याविहार स्टेशनजवळ, घाटकोपर पश्चिम, मुंबई ४०००८६. **ई मेल–** brupadhyay@hotmail.com<br>दावे पाठवण्यासाठी ई मेल आयडी – cirptoughcastingpvtltd@gmail.com, brupadhyay.irp@gmail.com |
| ११ | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | १७/०९/२०२४ ऑर्डर प्राप्त झाल्यापासून १४ दिवस |
| १२ | कलम २१ चे उपकलम (६ ए) चा खंड (बी) अंतर्गत लिक्विडेटरने निश्चित केलेले वर्ग (असल्यास) | लागू नाही |
| १३ | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या लिक्विडेटरची नावे (प्रत्येक वर्गासाठी ३ नावे) | लागू नाही |
| १४ | अ) संबंधित फॉर्म आणि ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत | लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, **मा. दि नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलने** ०३ सप्टेंबर २०२४ रोजी **टफ कास्टींग प्रायव्हेट लिमिटेडची** दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

**टफ कास्टींग प्रायव्हेट लिमिटेडच्या** कर्जदारांना १७ सप्टेंबर २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी पुराव्यासह त्यांचे दावे अ.नं. १० समोर नमूद केलेल्या पत्त्यावर लिक्विडेटरकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आर्थिक कर्जदारांनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व कर्जदार पुराव्यासह वैयक्तिकरीत्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच दावे सादर करू शकतात.

अनुक्रमांक १२ च्या समोर सूचीबद्ध केलेल्या वर्गातील आर्थिक कर्जदार, फॉर्ममध्ये वर्गाचा अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी अनुक्रमांक १३ च्या समोर सूचीबद्ध ३ लिक्विडेटरपैकी अधिकृत प्रतिनिधीची निवड सूचित करेल. CA लागू नाही.

**दाव्यांचा खोटा किंवा दिशाभूल करणारा पुरावा सादर केल्यास दंड आकारला जाईल.**

सही/– **भरत रमाकांत उपाध्ये**
अंतरीम निराकरण व्यावसायिक
रजि.नं. आयबीबीआय/आयपीए–००२/आयपी–एन ००१२०/२०१७–२०१८/१०२८९

दिनांक : ०४/०९/२०२४
स्थळ : मुंबई